N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** बोडवाड **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0037 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 02/04/2022 01:03 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 30/03/2022

**Date To ( दिनांक पर्यंत):** 01/04/2022

**Time From (वेळेपासून):** 10:00 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:02 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 01/04/2022 **Time (वेळ):** 23:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 017 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 01/04/2022 23:00 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 03 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** बोदवड शहरातील मलकापुर रोडवरील , बोदवड,बोदवड

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विठ्ठल भागवत पाटील

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | प्लट नं52 ,ज्ञानदेवनगर समध्दी अपार्टमेंट,समोर यमुना नगर,जळगाव,जळगाव,रामानंद, जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | प्लट नं52 ,ज्ञानदेवनगर समध्दी अपार्टमेंट,समोर यमुना नगर,जळगाव,जळगाव,रामानंद, जळगाव,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | योगेश्वर नागनाथराव टोंपे | | | 1. केअर ऑफ,श्रीकेजेपाटील सताजी नगर, पोलीस स्टेशन रोड ,मुक्ताईनगर , मुक्ताईनगर,मुक्ताई नगर,जळगाव, महाराष्ट्र,भारत |
| 2 | अनिल रावजी पाटील | | | 1. चिखली ,बोदवड,बोडवाड ,जळगाव, महाराष्ट्र,भारत |
| 3 | मंगेश वासुदेव पारीसे | | | 1. चंद्रकांत सोसायटी, बोदवड,बोदवड, बोडवाड ,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 4 | शरद समाधान जगताप | | | 1. रुपनगर ,बोदवड,बोदवड,बोडवाड , जळगाव,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 8,000 / रुपये ( त्यात 500/ रु.दराच्या 16 चलनी नोटा ) | 8,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 8,000.00

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

गुन्हयाची थोडक्यात हकिकत - यातील फिर्यादी यांचेकडेस दोन डंपर असुन सदर डंपरद्वारे ते बांधकामासाठी लागणारे मुरुम वाळु ,खडी इत्यादी साहीत्यांची वाहतुक करतात.दिनांक 20/03/2022 रोजी यातील आरोपी क्र.03 यांनी फिर्यादीस तुम्हाला डंपरद्वारे वाळु वाहतुक करु देण्यासाठी व डंपरवर कारवाई न करण्यासाठी 3,000 /- रुपये लाचेची मागणी केली तसेच दि.25/03/2022 रोजी फिर्यादी यांचे डंपर वाहन क्र.GJ 24 V 0569या वाहनात गुजरात येथुन शासकीय रयल्टी भरुन वाळुची वाहतुक करीत असतांना यातील आरोपी क्र.01 व 02 व आरोपी क्र.04यांनी सदरचे डंपर थांबवुन ठेवले त्यानंतर फिर्यादीने त्यांना सदर डंपर रयल्टी भरलेली असुन त्याबाबतची पावती दाखविली तेव्हा आरोपी क्र.01 यांनी सदरची पावती बघुन तुम्ही चुकीच्या मार्गाने वाळु वाहतुक करीत असल्याचे सांगितले.त्यानंतर आरोपी क्र.02 व04 यांनी फिर्यादी यांना तुम्ही तहसिलदार साहेब व आम्हास दरमहा 23,000 /- रुपये व आता डंपर सोडायचे 10,000 /- रुपये देवुन द्या असे सांगितले तेव्हा फिर्यादी यांनी त्यांचे जवळील 23,000 /- रुपये दिले यातील आरोपी क्र.01,02 व 04 यांनी 10,000 /- रुपये लाच रकमेची मागणी केली असल्याबाबत तसेच आरोपी क्र.03यांनी 3,000 /- रुपये लाच रकमेची मागणी केली असल्याबाबत फिर्यादी यांनी

दिनांक 30/03/2022 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो जळगांव कार्यालयात तक्रार दिली होती. सदर तक्रारीची दि.30/03/2022 रोजी ला.प्र.वि. अधिकारी यांनी पंच साक्षीदारा समक्ष पडताळणी केली असता यातील आरोपी क्र.02व 04 फिर्यादी यांचेकडेस तडजोडीअंती 5,000 /- रुपये लाच रकमेची मागणी करुन सदर लाच रक्कम आरोपी क्र.04 यांचेकडेस देण्यास सांगितली आरोपी क्र.01 यांनी सदर अपराधास सहाय्य करुन प्रोत्साहन दिले तसेच आरोपी क्र.03 यांनी फिर्यादी यांचेकडेस 3,000 /- रुपये लाच रकमेची मागणी करुन सदर लाच रक्कम आरोपी क्र.04 यांचेकडेस देण्यास सांगितली त्यानंतर दि.01/04/2022 रोजी एकुण 8,000 /- लाचेची रक्कम आरोपी क्र.04 यांनी वर नमुद वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचेकडुन पंचासमक्ष स्वतः स्विकारली म्हणुन गुन्हा गुन्ह्याचा तपास एन.एन.जाधव पोलीस निरीक्षक अँन्टी करप्शन जळगांव हे करीत आहेत.सदर सविस्तर टंकलिखीत केलेली फिर्याद सोबत जोडलेली आहे.

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): rajendra pandharinath gunjal(I (Inspector)) / **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
**Rank** (पद):
**No.(क्र.):** **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14.Signature/Thumb Impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15.Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

आय्युब ग.तडवी
पो.हे.कॉ./७८३
बोदवड पो.स्टे

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name (नाव):** rajendra pandharinath gunjal
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

फिर्याद

बोदवड पोलीस स्टेशन
दिनांक ०१/०४/२०२२

**मी विठठल भागवत पाटील, वय.३४ वर्षे, व्यवसाय कन्स्ट्रक्शन व सप्लायर्स,**
**रा.प्लॉट नं.५२,ज्ञानदेव नगर, समृध्दी अपार्टमेंट समोर, यमुना नगर,जळगांव जि.जळगांव**

समक्ष हजर राहुन फिर्याद लिहुन देतो की, मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहतो. मी बांधकामाचा व्यवसाय करुन बांधकामासाठी लागणारे साहीत्य पुरवितो.

मी दि.२९.०३.२०२२ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांवचे पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांना फोन करुन बोदवड येथील तहसिलदार श्री.टोंपे, तहसिलदार यांचे वाहनावरील चालक अनिल पाटील,खाजगी इसम शरद जगताप व तलाठी मंगेश पारीसे यांचे विरुध्द तोंडी तक्रार दिली होती व मी दि.३०.०३.२०२२ रोजी बोदवड तहसिल कार्यालय येथे जावुन त्यांची भेट घेणार असल्याचे तसेच मी आपणास बोदवड येथे भेटणार असल्याचे कळविले होते. त्याप्रमाणे मी दि.३०.०३.२०२२ रोजी बोदवड ते जामनेर रोडवर बोदवड शहरापासुन दोन कि.मी.अंतरावर नविन प्लॉटींगच्या ठिकाणी थांबलो होतो. तेव्हा अॅन्टी करप्शन ब्युरो, जळगांवचे पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब हे सापळा पथकासह माझेजवळ आले. तेव्हा त्यांनी स्वत:ची तसेच खाजगी वाहनात उपस्थित असलेले पोनि.एन.एन.जाधव मॅडम, पोनि.एस.के.बच्छाव, दोन शासकिय पंच व सापळा पथक अशांची ओळख करुन दिली. तसेच पोनि.एन.एन.जाधव यांची सापळा अधिकारी म्हणुन ओळख करुन दिली. तेव्हा मी माझी तक्रार पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांचेकडेस प्रथम तोंडी कथन केली. त्यानंतर मी माझे स्वत:चे हस्ताक्षरात माझी सविस्तर तक्रार लिहुन ती पुढील प्रमाणे आहे.

समक्ष हजर राहुन तक्रार लिहुन देतो की, मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहतो. मी बांधकामाचा व्यवसाय करुन बांधकामासाठी लागणारे साहीत्य पुरवितो. सदरचा व्यवसाय मी जळगांव,भुसावळ व बोदवड या ठिकाणी करतो. बांधकामासाठी लागणारे मुरुम,वाळु,खडी इत्यादी साहीत्याची वाहतुक करण्यासाठी माझे स्वत:चे नावे एक डंपर वाहन घेतलेले असुन त्याचा क्र.एम.एच.१९ वाय.२३१३ असा आहे. तसेच माझे मित्र श्री.यतीन पाटील रा.जळगांव यांचे नावे एक डंपर वाहन असुन त्याचा क्रं.जी.जे.२४ व्ही. ०५६९ असा आहे. सदरचे डंपर मी सुमारे दोन महिन्यापासुन श्री.यतीन पाटील यांचेकडुन भाडेतत्वावर चालविण्यासाठी घेतलेले आहे. त्याचे दरमहा भाडे श्री.यतीन पाटील यांना देत असतो. वरील दोन्ही डंपर हे बांधकामासाठी लागणारे मुरुम,वाळु,खडी इत्यादी साहीत्याची वाहतुक करण्यासाठी वापरतो. वरील दोन्ही डंपरव्दारे मी सुमारे दोन महिन्यापासुन गुजरात येथुन शासकिय रॉयल्टी भरुन वाळु आणतो व मागणी प्रमाणे सदरची वाळु जळगांव,भुसावळ व बोदवड या ठिकाणी पोहचविण्याचे काम करतो.

दि.२०.०३.२०२२ रोजी मी माझे डंपर वाहनाचे पेमेंट घेण्यासाठी बोदवड येथे गेलो होतो. सदर वेळी बोदवड येथील तलाठी मंगेश पारीसे हे भेटले व त्यांनी मला सांगितले की, तुम्ही डंपरव्दारे अवैध वाळुची वाहतुक करीत असुन तुमचे डंपर मी जमा करुन डंपरवर कारवाई करुन टाकेल, तुमच्य डंपरव्दारे वाळु वाहतुक करायची असेल व तुम्हाला डंपर वाहनावर कारवाई टाळायची असेल तर तुम्ही मला दरमहा ३०००/—रु.आणुन द्यावे लागतील, नाहीतर मी तुमचे डंपर जप्त करुन कारवाई करुन टाकेल असे सांगितले. तेव्हा मी त्यांना सद्या माझेजवळ पैसे नाहीत, तुमच्या या महिन्याचे ३०००/—रु.पाच/सहा दिवसात आणुन देतो असे सांगुन निघुन आलो होतो.

त्यानंतर दि.२५.०३.२०२२ रोजी डंपर वाहन क्रं.जी.जे.२४ व्ही.०५६९ या वाहनात गुजरात येथुन शासकिय रॉयल्टी भरुन वाळु भरली. सदरची वाळु बोदवड येथे पोहचविण्यासाठी डंपरव्दारे वाहतुक करुन चालक सुरेश भोई हा रात्री १०.३० ते ११.३० वा.चे सुमारास कु—हे पानाचे ते बोदवड रोडवरील सिंधी सुरवाडे गांवा जवळुन डंपर घेवुन जात असतांना तहसिलदार बोदवड यांचे वाहनातील पथकाने माझे डंपर थांबविले व सदर वाहनावरील चालक याने डंपर चालकास तु अवैध वाळु वाहतुक करीत असुन तुझे डंपर जमा करतो तु डंपर मालकाला लागलीच या ठिकाणी बोलावुन घे असे सांगितले व डंपर वाहन थांबवुन ठेवले. त्यामुळे चालक सुरेश भोई यांनी मला डंपर थांबवुन ठेवल्याबाबत फोनव्दारे कळविले. त्यावरुन मी सदर ठिकाणी पोहचलो. तेव्हा सदर ठिकाणी उपस्थित असलेले बोदवड येथील तहसिलदार श्री.टोंपे यांनी मला तुम्ही डंपर व्दारे अवैध वाळुची वाहतुक करीत असल्याचे सांगितले. तेव्हा मी त्यांना सदर डंपरची रॉयल्टी भरलेली असुन त्याबाबतची पावती दाखविली. तेव्हा श्री.टोंपे साहेब यांनी सदरची पावती बघुन तुम्ही चुकीच्या मार्गाने वाळु वाहतुक करीत असल्याचे सांगुन त्यांचे शासकिय वाहनात जावुन बसले व सदरची पावती त्यांचे गाडीवरील चालक अनिल पाटील यांचेकडे दिली व त्यांना काहीतरी सांगितले.

त्यानंतर तहसिलदार यांचे वाहन चालक अनिल पाटील व सदर वाहनातील खाजगी इसम शरद जगताप हे माझे जवळ आले व मला बाजुला घेवुन गेले व सांगितले की, तुमचे जवळ जरी रॉयल्टीची पावती असली तरीही तहसिलदार साहेब व आम्ही कोणत्याही कारणावरुन तुमचे वाळुचे डंपरवर कारवाई करु शकतो, आता तुमचे डंपर बोदवड तहसिल कार्यालयात जमा होवुन जाईल, तुमच्या डंपरव्दारे आमच्या हद्दीतुन वाळु वाहतुक करायची असेल व तुमचे वाहनावर कारवाई टाळायची असेल तर तुम्ही तहसिलदार साहेब व आम्हास दरमहा २३,०००/—रु.व आता डंपर सोडायचे १०,०००/—रु.देवुन द्या, तुम्ही जर पैसे दिले नाही तर, तुमचे डंपर जमा करुन कारवाई करु असे सांगितले. तेव्हा मी भितीपोटी त्यांना माझे जवळ असलेले २३,०००/—रु.देवुन उर्वरीत १०,०००/—रु.दोन/चार दिवसात आणुन देतो असे सांगितले. तेव्हा चालक अनिल पाटील यांनी माझेजवळुन २३,०००/—रु.रोख स्वरुपात घेतले. तेव्हा खाजगी इसम शरद जगताप यांनी मला तुम्ही येण्याचे अगोदर मला मोबाईल फोनवर फोन लावा असे सांगितले. त्यानंतर मी सदर ठिकाणाहुन निघुन आलो.

तेव्हा माझे वर नमुद डंपरव्दारे बोदवड तहसिल हद्दीतुन वाळुची वाहतुक करु देण्यासाठी व वाळुचे डंपरवर कोणतीही कारवाई न करण्यासाठी तहसिलदार श्री.टोंपे, चालक अनिल पाटील व खाजगी इसम शरद जगताप यांनी दरमहा २३,०००/—रु. व

(डाव्या समासात हस्तलिखित: बोदवड पो.स्टे. CCTNS गु.र.नं. 37/2022 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम सन 1988 चे क. 7,7(अ) व 12 प्रमाणे दि.01/04/2022 रोजी 23:00 वा. दाखल 17 वर नोंद आहे.)

आय्युब गं.तडवी
पो.हे.कॉ./७८३
बोदवड पो.स्टे.

एन. एन. जाधव
पोलीस निरिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

वाळुचे डंपर सोडण्यासाठी १०,०००/–रु. असे एकुण ३३,०००/–रु.मागणी करुन त्यापैकी २३,०००/–रु.रोख स्वरुपात स्विकारुन उर्वरीत १०,०००/–रु.लाच रकमेची मागणी करीत असल्याचे तसेच तलाठी मंगेश पारीसे हे देखील मला माझे डंपर वाहनाने वाळुची वाहतुक करु देण्यासाठी व वाळुचे डंपरवर कोणतीही कायदेशीर कारवाई न करण्यासाठी दरमहा ३०००/–रु.लाच रकमेची मागणी करीत असल्याचे माझे लक्षात आले.

मला तहसिलदार श्री.टोंपे, चालक अनिल पाटील व खाजगी इसम शरद जगताप यांना त्यांनी केलेल्या मागणी प्रमाणे उर्वरीत १०,०००/–रु.लाच रक्कम व तलाठी मंगेश पारीसे यांना दरमहाची ३०००/–रु.लाच रक्कम देण्याची मनापासुन इच्छा नाही. परंतु मी जर त्यांना लाचेची रक्कम दिली नाही तर ते मला माझे डंपरने वाळुची वाहतुक करु देणार नाही अथवा माझे डंपरवर विनाकारण कारवाई करुन डंपर जप्त करुन टाकतील. म्हणुन मी नाईलाजास्तव तहसिलदार श्री.टोंपे, चालक अनिल पाटील व खाजगी इसम शरद जगताप तसेच तलाठी मंगेश पारीसे यांना लाचेची रक्कम देण्यास तयार झालो आहे.

माझा तहसिलदार श्री.टोंपे, चालक अनिल पाटील व खाजगी इसम शरद जगताप तसेच तलाठी मंगेश पारीसे यांचेशी कोणत्याही प्रकारचा पैशांचा देवाणघेवाण अथवा उसनवारीचा व्यवहार नाही अथवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचा वैरभाव नाही. त्यांच्या विरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई होणेकरीता सदरची तक्रार दिली आहे. मी दि.३०.०३.२०२२ रोजी तहसिलदार श्री.टोंपे, चालक अनिल पाटील व खाजगी इसम शरद जगताप तसेच तलाठी मंगेश पारीसे यांची भेट घेण्यासाठी तहसिल कार्यालय,बोदवड येथे जाणार आहे. बाबत तक्रार दिली.

त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी मला व पंच क्रं.१ अशांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी त्यांचे कडेस असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखविले व त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी मला व पंच क्रं.१ अशांना पुन्हा सुचना देवुन सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे गळयात लटकवुन दिले. त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी मला पंच क्रं.१ यांचेसह तहसिल कार्यालय बोदवड येथे तहसिलदार श्री.टोंपे, चालक अनिल पाटील व खाजगी इसम शरद जगताप तसेच तलाठी मंगेश पारीसे यांची भेट घेण्यासाठी माझे चारचाकी बोलेरो वाहनाने पाठविले होते. तेव्हा मी पंच क्रं १ यांचेसह तहसिल कार्यालय बोदवड येथे गेलो. त्यानंतर मी माझी चारचाकी बोलेरो वाहन कार्यालयाच्या आवारात उभी केली. त्यानंतर मी शरद जगताप यांनी सांगितल्यानुसार त्यांचे मोबाईल फोनवर फोन लावुन तहसिल ऑफिसला आलो असल्याचे सांगितले. त्यानंतर लागलीच शरद जगताप हे मी व पंच क्रं.१ असे उभे असलेल्या ठिकाणी आले. तेव्हा शरद जगताप व माझेत माझे डंपर वाहनाविषयी चर्चा झाली. त्यानंतर शरद जगताप यांनी चालक अनिल पाटील यांना फोन करुन सदर ठिकाणी बोलावुन घेतले. तेव्हा माझेत व चालक अनिल पाटील यांचेत माझे डंपरवर वाळु वाहतुक करण्यासंदर्भात चर्चा झाली. तेव्हा अनिल पाटील यांनी मला दहा हजार रुपये देणे आहे, हे समजुन घ्या असे सांगुन साहेबांना भेटुन घ्या असे सांगितले. तेव्हा मी अनिल पाटील व शरद जगताप यांना दहा हजार रुपये जास्त होतात, थोडे कमी झाले तर बरं होईल असे सांगितले असता अनिल पाटील यांनी तुम्ही आकडा बोलु नका असे सांगुन दोन्ही हाताच्या पहिल्या बोटाने इशारा करुन अर्धे देईल असा इशारा करा असे सांगितले. त्यानंतर पुन्हा शरद जगताप, अनिल पाटील व माझेत माझे डंपर वाहनाविषयी चर्चा झाली. त्यानंतर मी तसेच अनिल पाटील व शरद जगताप असे तहसिलदार यांचे कक्षात गेलो. तेव्हा पंच क्रं.१ हे सदर कक्षाचे दरवाज्याजवळ उभे होते. त्यानंतर मी तहसिलदार श्री.टोंपे यांना नमस्कार केला. त्यानंतर तहसिलदार श्री.टोंपे, अनिल पाटील, शरद जगताप व माझेत माझे डंपर वाहनाविषयी चर्चा झाली. तेव्हा तहसिलदार श्री.टोंपे यांनी मला आम्ही मेहरबानी करतो, तुम्ही स्वतःच प्रोब्लेम क्रिएट करुन घेतले, यावं क्लीअरींग करुन टाका असे सांगितले असता मी अनिल पाटील व शरद जगताप यांचेकडे इशारा करुन दहा हजार रुपये म्हणता आहेत हे असे सांगितले. तेव्हा अनिल पाटील यांनी तहसिलदार श्री.टोंपे यांना दोन्ही हाताच्या पहिल्या बोटाने इशारा करुन अर्धे म्हणजेच पाच हजार रुपये म्हणतो आहे असा इशारा केला. तेव्हा तहसिलदार श्री.टोंपे यांनी ठिक आहे, असे सांगितले. तेव्हा मी कोणाकडे द्यायाचे असे विचारले असता शरद जगताप यांनी अनिलकडे देण्यास सांगितले. तेव्हा मी त्यांना अनिल भाउकडुन त्या दुस–या गाडीचं करुन घेईल, आता अनिल भाउकडे देवुन देतो असे सांगितले असता तहसिलदार श्री.टोंपे यांनी मानेने होकार दर्शविला. तेव्हा मी तहसिलदार श्री.टोंपे यांना येतो साहेब अनिल भाउकडे देतो पाच हजार असे सांगितले. त्यानंतर आम्ही सर्वजण सदर कक्षाचे बाहेर आलो. तेव्हा पंच क्रं.१ हे माझेजवळ येवुन उभे राहीले. त्यानंतर अनिल पाटील यांनी शरद जगताप यांचेकडे इशारा करुन यांच्याकडे करुन द्या असे सांगितले. तेव्हा मी त्यांना पाच हजार देवु का दहा हजार असे विचारले असता शरद जगताप यांनी साहेबांनी पाच हजार सांगितले असल्याचे सांगितले. तेव्हा अनिल पाटील यांनी मी साहेबांना बोललो तुमचे दहाचे पाच झाले असे सांगुन शरद जगताप यांचेकडे इशारा करुन यांच्याकडे देवुन द्या असे सांगितले. तेव्हा मी त्यांना थोडया वेळाने आणुन देतो असे सांगितले. त्यानंतर अनिल पाटील व शरद जगताप हे सदर ठिकाणाहुन निघुन गेले. त्यानंतर मी तलाठी मंगेश पारीसे यांना त्यांचे मोबाईल फोनवर फोन लावला व तहसिल ऑफिसला येण्यास सांगितले. तेव्हा त्यांनी पाच मिनीटात येतो असे सांगितले. त्यानंतर काही वेळाने तलाठी मंगेश पारीसे हे मी व पंच क्रं.१ असे उभे असलेल्या ठिकाणी आले. तेव्हा तलाठी मंगेश पारीसे व माझेत माझे डंपर वाहनाविषयी चर्चा झाली. त्यानंतर तलाठी मंगेश पारीसे यांना मी रेग्युलर तीन हजार रुपये देतोच असे सांगितले असता तलाठी मंगेश पारीसे यांनी होकार दर्शविला.तेव्हा मी तलाठी मंगेश पारीसे यांना उजव्या हाताच्या दोन बोटांचा इशारा करुन म्हणजेच दोन हजार रुपये होतील का? असे विचारले असता त्यांनी काय कमी करता आता, आता आहेच काय त्याच्यात असे सांगितले असता मी तलाठी मंगेश पारीसे यांना तीन हजार देवुन टाकु मंग असे विचारले असता त्यांनी होकार दर्शवुन शरदकडे देवुन द्या असे सांगितले.तेव्हा मी त्यांना तुम्ही किती वेळ आहे? असे विचारले असता त्यांनी अर्धा तास आहे असे सांगितले. त्यानंतर मी व पंच क्रं.१ असे सापळा पथकाजवळ परत आलो होतो. त्यानंतर माझे व तहसिलदार श्री.टोंपे, चालक अनिल पाटील व खाजगी इसम शरद जगताप तसेच

(signature)
एन. एन. जाधव
पोलीस निरिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक ब्युरो,जळगांव

(signature)

तलाठी मंगेश पारीसे यांचे मधील संभाषण दोन्ही पंचानी व पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी ऐकले.तेव्हा दोन्ही पंच व पोनि.एन.एन. जाधव मॅडम यांची लाचमागणी बाबत खात्री झाल्याने व वेळ कमी असल्याने पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी पुढील सापळा कार्यवाही सलगपणे करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर तहसिलदार श्री.टोंपे, चालक अनिल पाटील व खाजगी इसम शरद जगताप तसेच तलाठी मंगेश पारीसे यांना देण्यासाठी मी माझे घर खर्चामधुन आणलेली ८,०००/—रू. रक्कम (त्यात ५००/—रू.दराच्या १६ नोटा) पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांचे समक्ष हजर केली. तेव्हा पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांचे सुचनेनुसार पोकॉ/ईश्वर धनगर यांनी सदर नोटांना अ.पावडर लावुन सदरच्या नोटा माझे शर्टचे पुढील डाव्या बाजुच्या खिश्यात अलगद ठेवुन दिल्या होत्या. त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी मला व पंच क्र.१ अशांना पुन्हा महत्वाच्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये पुन्हा नविन मेमरी कार्ड टाकुन सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला पंच क्र.१ यांचेसह तहसिलदार श्री.टोंपे, चालक अनिल पाटील व खाजगी इसम शरद जगताप यांनी मागणी केल्याप्रमाणे ५०००/—रु.लाच रक्कम तसेच तलाठी मंगेश पारीसे यांनी मागणी केल्याप्रमाणे ३०००/—रु.लाच रक्कम असे एकुण ८,०००/—रु.लाच रक्कम खाजगी इसम शरद जगताप यांचेकडे देण्यासाठी बोदवड तहसिल कार्यालय येथे पाठविले होते. त्यानंतर मी पंच क्र.१ यांचे सह बोदवड तहसिल कार्यालय येथे गेलो. तेव्हा पोनि.एन.एन.जाधव यांनी बोदवड तहसिल कार्यालयाच्या आजुबाजुस सापळा लावला होता.तेव्हा मी व पंच क्र.१ असे तहसिल कार्यालयाच्या आवारात गेलो असता सदर ठिकाणी अनिल पाटील हे भेटले. तेव्हा मी त्यांना लाचेची रक्कम देवु केली असता त्यांनी तिकडे करुन घ्या तुम्ही असे सांगितले असता मी त्यांना शरदकडे देवु का? असे विचारले. तेव्हा त्यांनी मानेने होकार दिला. त्यानंतर मी व पंच क्र.१ असे थोडया अंतरावर जावुन खाजगी इसम शरद जगताप यांच्या मोबाईल फोनवर फोन लावला असता त्यांनी दवाखान्यात असल्याचे सांगितले. त्यानंतर मी माझे मोबाईल फोनवरुन तलाठी मंगेश पारीसे यांचे मोबाईलवर फोन लावला. तेव्हा त्यांनी देखील शरद आहे, शरद पाहुन घेईन असे सांगितले. त्यानंतर मी पुन्हा माझे मोबाईल फोनवरुन खाजगी इसम शरद जगताप यांचे मोबाईल फोनवर फोन लावला. तेव्हा त्यांनी मी दवाखान्यात आलो असल्याचे सांगितले.त्यानंतर मी व पंच क्र.१ असे सापळा पथकाजवळ परत आलो होतो.

त्यानंतर माझे तसेच चालक अनिल पाटील व खाजगी इसम शरद जगताप यांचे मधील संभाषण दोन्ही पंचानी व पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी ऐकले. तेव्हा पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी सदर सापळा कार्यवाही स्थगित करुन पुढील सापळा कार्यवाही दि. ०१.०४.२०२२ रोजी करण्याचा निर्णय घेतला व माझे जवळील लाचेची रक्कम ताब्यात घेतली.तसा सविस्तर लाच मागणी पडताळणी /सापळापुर्व/सापळा स्थगिती पंचनामा केला आहे.

त्यानंतर मी दि.०१.०४.२०२२ रोजी बोदवड ते जामनेर रोडवर बोदवड शहरापासुन दोन कि.मी.अंतरावर नविन प्लॉटींगच्या ठिकाणी थांबलो होतो. तेव्हा पोनि.एन.एन.जाधव मॅडम व सापळा पथक खाजगी वाहनाने माझेजवळ आले. तेव्हा पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी मला व पंच क्र.१ अशांना थोडक्यात सुचना दिल्या.

त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी त्यांचे ताब्यातील अ.पा.लावलेल्या लाचेच्या ५००/—रु. दराच्या १६ नोटा पोकॉ. ईश्वर धनगर यांचेकडे दिल्या. त्यानंतर पोकॉ.ईश्वर धनगर यांनी सदर लाचेच्या नोटांची घडी करुन त्या नोटा माझे शर्टचे पुढील डाव्या बाजुच्या खिश्यात अलगद ठेवुन दिल्या होत्या. त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी मला व पंच क्र.१ अशांना पुन्हा महत्वाच्या सुचना दिल्या. त्यानंतर मी खाजगी इसम शरद जगताप यांचे मोबाईल फोनवर फोन लावला असता त्यांनी मी दुकानावर असल्याचे सांगितले. तेव्हा पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी मला शरद जगताप हे नेहमी बसत असलेल्या बोदवड शहरातील मलकापुर रोडवरील वरद ट्रेडर्स या दुकानावर पाठविण्याचे ठरविले. त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला पंच क्र.१ यांचेसह तहसिलदार श्री. टोंपे, चालक अनिल पाटील व खाजगी इसम शरद जगताप यांनी मागणी केल्याप्रमाणे ५०००/—रु.लाच रक्कम तसेच तलाठी मंगेश पारीसे यांनी मागणी केल्याप्रमाणे ३०००/—रु.लाच रक्कम असे एकुण ८,०००/—रु.लाच रक्कम खाजगी इसम शरद जगताप यांचेकडे देण्यासाठी बोदवड शहरातील मलकापुर रोडवरील वरद ट्रेडर्स या दुकानावर पाठविले होते.

त्यानंतर मी पंच क्र.१ यांचे सह बोदवड शहरातील मलकापुर रोडवरील वरद ट्रेडर्स या दुकानावर गेलो. तेव्हा पोनि.एन.एन. जाधव मॅडम यांनी बोदवड शहरातील मलकापुर रोडवरील वरद ट्रेडर्स या दुकानाच्या आजुबाजुस सापळा लावला होता. तेव्हा मी व पंच क्र.१ असे शरद जगताप यांचेजवळ गेलो. तेव्हा शरद जगताप हे सदर दुकानात एका टेबल समोरील खुर्चीवर बसलेले होते. त्यानंतर माझेत व शरद जगताप यांचेत माझे वाळुचे डंपर वाहनाविषयी चर्चा झाली. तेव्हा मला शरद जगताप यांनी उजव्या हाताचा अंगठा व पहिल्या बोटाने पैसे आणले आहेत का?असा इशारा केला. तेव्हा मी माझे शर्टचे वरील डाव्या बाजुच्या खिश्यात असलेली एकुण लाच रक्कम ८,०००/—रु. उजव्या हाताने बाहेर काढून सदर लाच रक्कम शरद जगताप यांचे समोर धरली तेव्हा त्यांनी हाताच्या इशा—याने सदर लाचेची रक्कम त्यांचे समोरील टेबलचा ड्रावर उघडुन सदर लाचेची रक्कम ड्रावरमध्ये ठेवण्यास सांगितली. तेव्हा मी सदर लाचेची रक्कम शरद जगताप यांचे समोरील टेबलच्या पहिल्या ड्रावरमध्ये ठेवुन दिली. त्यानंतर मी ठरवुन दिल्या प्रमाणे सापळा पथकास ईशारा केला. तेव्हा पोनि.एन.एन.जाधव मॅडम व सापळा पथक यांनी शरद जगताप यास रंगेहाथ पकडले. त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांचे सुचने नुसार माझे गळयातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन ते बंद केले. तेव्हा पोनि.एन.एन. जाधव मॅडम यांनी शरद जगताप यांना त्यांची व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी शरद जगताप यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव शरद समाधान जगताप, वय २५ व्यवसाय मजुरी रा. रुपनगर बोदवड जि.जळगांव असे सांगितले. त्यानंतर सापळा पथकाने शरद जगताप यांना ताब्यात घेतले.त्यानंतर सापळा पथकाने

एन. एन. जाधव
पोलीस निरिक्षक
अँटी करप्शन ब्युरो,जळगांव

चालक अनिल पाटील व तलाठी मंगेश पारीसे यांना ताब्यात घेतले. तेव्हा पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी चालक अनिल पाटील व तलाठी मंगेश पारीसे यांना त्यांची व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी प्रथम चालक अनिल पाटील यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव अनिल रावजी पाटील, वय ५१, व्यवसाय नोकरी, वाहन चालक, तहसिल कार्यालय, बोदवड रा.चिखली ता.बोदवड जि.जळगांव असे सांगितले. त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी तलाठी मंगेश पारीसे यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव मंगेश वासुदेव पारीसे, वय ३१, व्यवसाय नोकरी, तलाठी सजा बोदवड जि.जळगांव रा.चंदंकांत सोसायटी, बोदवड असे सांगितले. तेव्हा तहसिलदार श्री.टोंपे हे कार्यालयात हजर नसल्याने व ते खाजगी वाहनाने जिल्हाधिकारी कार्यालय जळगांव येथे गेले असल्याचे समजले. तेव्हा सापळा पथकातील पोलीस उप अधिक्षक श्री.एस.एस.पाटील यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयात उपस्थित असलेले सफौ.दिनेशसिंग पाटील, पोहेकॉ.सुनिल पाटील व पोकॉ.प्रदिप पोळ यांचेशी संपर्क साधुन त्यांना जळगांव जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात जावुन तहसिलदार श्री.टोंपे यांचेवर पाळत ठेवुन त्यांना ताब्यात घेवुन अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयात हजर करणेबाबत आदेश दिले होते.

त्यानंतर पुढील सापळा कारवाई अॅन्टी करप्शन ब्युरो जळगांव कार्यालयात करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर सापळा पथक अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगाव कार्यालयात पोहचले. तेव्हा सफौ.दिनेशसिंग पाटील व त्यांचे टिमने तहसिलदार श्री.टोंपे यांना ताब्यात घेवुन कार्यालयात बसवुन ठेवलेले होते. तेव्हा पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी तहसिलदार श्री.टोंपे यांना त्यांची व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर पोनि.एन.एन.जाधव मॅडम यांनी श्री.टोंपे यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव योगेश्वर नागनाथराव टोंपे, वय ३२,व्यवसाय नोकरी, तहसिलदार, तहसिल कार्यालय,बोदवड जि.जळगांव रा.केअर ऑफ श्री.के.जे. पाटील, संताजी नगर, पोलीस स्टेशन रोड,मुक्ताईनगर,जि.जळगांव असे सांगितले. त्यानंतर कार्यालयात पुढील सापळा कार्यवाही केली आहे. तसा यशस्वी सापळा पंचनामा केला आहे.

अशा प्रकारे दि.३०.०३.२०२२ रोजी आरोपी क्र.२ अनिल रावजी पाटील,चालक व आरोपी क्र.४ शरद समाधान जगताप खाजगी इसम यांनी पंचासमक्ष माझे डंपरव्दारे वाळु वाहतुक करु देण्यासाठी व डंपर वाहनावर कारवाई न करण्यासाठी माझेकडेस तडजोडीअंती ५,०००/–रु.लाच रक्कमेची मागणी करुन सदर लाच रक्कम आरोपी क्र.४ शरद समाधान जगताप,खाजगी इसम यांचेकडे देण्यास सांगितली. सदर अपराधास आरोपी क्र.१ योगेश्वर नागनाथराव टोंपे,तहसिलदार यांनी सहाय करुन प्रोत्साहन दिले. तसेच आरोपी क्र.३ यांनी मंगेश वासुदेव पारीसे,तलाठी यांनी पंचासमक्ष माझे डंपरव्दारे वाळु वाहतुक करु देण्यासाठी व डंपर वाहनावर कारवाई न करण्यासाठी माझेकडेस ३,०००/–रु.लाच रक्कमेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम आरोपी क.४ शरद जगताप,खाजगी इसम यांचेकडे देण्यास सांगितली. त्यानंतर आरोपी क्र.४ शरद जगताप,खाजगी इसम यांनी पंचासमक्ष माझेकडुन दि.०१.०४.२०२२ रोजी १३.०२ वा.बोदवड शहरातील मलकापुर रोडवरील वरद ट्रेडर्स या दुकानावर ८,०००/–रु.लाचेची रक्कम स्वतः स्विकारली. आहे.म्हणुन माझी वर नमुद आरोपी क्र. १ ते ४ यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील नमुद फिर्याद मी सांगितल्या प्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असुन ती मी वाचुन पाहीली ती मी सांगितल्या प्रमाणे टंकलीखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

समक्ष
(signature)
एन. एन. जाधव
पोलीस निरिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव

फिर्यादीची सही
(signature)
विठ्ठल भगवान पाटील